# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (शिक्षण विभाग)

**जा.क्र. /1387 /शि.वि.** **दि. 17/12/2013**

## शिक्षण सप्ताह 2013–14

**प्रति,**

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
सर्व प्राथ.शाळा/उच्च प्राथमिक शाळा,
म.न.पा., नागपूर.

नागपूर म.न.पा. शिक्षण विभागाच्या वतीने शिक्षण सप्ताह साजरा करण्याचे ठरविले आहे. बालक/बालिकांच्या स्पर्धा खालील आराखडयाप्रमाणे होतील.

1. अ. संघ वर्ग 1 व 5
2. ब संघ वर्ग 6 व 8
3. क. संघ वर्ग 9 व 12

- '**अ**' संघातील कोणत्याही शाळेला जास्तीत जास्त 3 कवायती एक खेळ व दौड इतक्या विषयात भाग घेणे अनिवार्य राहील. '**ब**' गटातील कोणत्याही शाळेला जास्तीत जास्त 2 कवायती एक खेळ व दौड इतक्या विषयात भाग घेणे अनिवार्य राहील.
- कोणत्याही शाळेला मुलांची व मुलींची चमु नियमानुसार आणता येईल.
- शिक्षण सप्ताह प्राविण्य :– अ व ब संघ प्राविण्य शिल्ड क्रमांक प्रथम, द्वितीय व तृतीय संघातील समाविष्ट शाळांमधून काढण्यात येईल.

**झोन क्रिडा स्पर्धा** :– या स्पर्धा त्या त्या गटात प्रथम होतील. झोन प्रमुख शाळा निरीक्षक राहतील व त्यांच्या झोनची स्पर्धा निकोप राहण्यासाठी व सुरळीत पार पाडण्यासाठी शाळा निरिक्षकांचे आदेश पाळणे अनिवार्य राहील. त्यांनी नेमून दिलेले कार्य पार पाडणे प्रत्येक शिक्षकाला बंधनकारक राहील.

**स्पर्धेत भाग घेण्याबाबत सुचना** :– 1) प्रत्येक शाळेला स्पर्धेत भाग घेणे अनिवार्य राहील. भाग न घेणाऱ्या शाळेच्या मुख्याध्यापकास व्यक्तिशः जबाबदार धरण्यात येऊन नियमानुसार कारवाई करण्यात येईल. 2) स्पर्धेत भाग घेण्याबाबत प्रवेश पत्राचा नमूना सोबत जोडला आहे. हे प्रवेश पत्र प्रत्येक शाळेने आपले शाळा निरीक्षक यांना 23/12/2013 पूर्वी पोहोचते करावे. या तारखेनंतर आलेले प्रवेशपत्र स्विकारल्या जाणार नाही.

**विशेष सुचना :–** 1) स्पर्धापुढे दिलेल्या आराखडयातील विषया नुरूप होईल.
2) झोन स्तरावरून निवडून आलेल्या संघाची केंद्रिय स्पर्धा घेण्यात येईल.
2) हस्त व्यवसाय, बौध्दीक व नाटय मनोरंजन या स्पर्धा केंद्रीय स्तरावर होतील.
3) झोन निहाय क्रिडा स्पर्धेतून क्र. 1 काढण्यात येईल.

# शिक्षण सप्ताह विषय

## अ व ब (दोन्ही गटांसाठी)

**क्रिडा स्पर्धा खेळ**

1) कबड्डी, मुले/मुली
2) लंगडी फक्त मुलींसाठी

**कवायती**

1. साधी कवायत
2. दौड 100 मि./70 मि.
3. व्यांड
4. डंबेल्स,
5. रूमाल कवायत (केवळ वाद्य वापरावे)
6. रिंग कवायत
7. आसन/योगासन

**हस्त व्यवसाय स्पर्धा**

1) मातीचे फळे, वस्तू तयार करणे.
2) टाकाऊ वस्तूपासून कलाकृती वस्तू तयार करणे.
3) चित्रकला स्पर्धा
4) कागदी हार तयार करणे.
5) खेळणी तयार करणे.

**बौद्धिक स्पर्धा**

1. वक्तृत्व स्पर्धा
2. सामान्य ज्ञान स्पर्धा
3. निबंध स्पर्धा
4. कविता पाठांतर स्पर्धा
5. हस्ताक्षर स्पर्धा
6. पाढे पाठांतर स्पर्धा

**नाटय मनोरंजन स्पर्धा** :–

**अ. वैयक्तीक**

2. नक्कल
3. कथाकथन
3. भजन
4. नृत्य

**ब संघिक**

1) लोक नृत्य
2) प्रयाणगीत
2) लोकगीत (पोवडा, लावणी, कव्वाली)
3) गोष्टीचे नाटयीकरण

**बौध्दीक स्पर्धा (केंद्रीय स्पर्धा)**

1. **वकृत्व स्पर्धा** : (वेळ 3 मिनीटे) विषय :– मी पंतप्रधान झालो तर, (ब गट)
:– मी मुख्याध्यापक झालो तर (अ गट)
2. **निबंध विषय** – स्वामी विवेकानंद
3. सामान्य ज्ञान स्पर्धा
4 कविता पाठांतर स्पर्धा
5 हस्ताक्षर स्पर्धा
6 पाढे पाठांतर स्पर्धा

**नियम :**

1) सामान्य ज्ञान स्पर्धा करिता वेळ 45 मिनिटे राहील. गुण 50 (मराठी, हिंदी, उर्दू) विद्यार्थ्यांना एकच प्रश्नपत्रिका देण्यात येईल.
2. बालभारती या क्रमिक पुस्तकातील कोणतीही एक कविता म्हणावी लागेल. साथ घेता येणार नाही. पाठांतरात ताल, सुर व हावभाव यांना महत्व राहील. परीक्षक जवळ कवितेची एक प्रत द्यावी लागेल.
3. बौध्दीक शिल्ड स्पर्धेकरीता शाळांना कमीतकमी 3 विषयात भाग घेणे अनिवार्य आहे.
4. शाळेला प्रत्येक विषयात जास्तीत जास्त 2 मुले/मुली पाठविता येतील.
5. प्रत्येक विषयाची मुले/मुली स्वतंत्र असावी कारण सर्वच स्पर्धा एकाच वेळ सुरू होतील.
6. सर्व स्पर्धा मराठी, हिंदी, उर्दू माध्यमातून होईल.
7. **पाढे पाठांतर स्पर्धा :–** अ गट 1 ते 30 पर्यंत
   ब गट 1 ते 30 पुढे पर्यंत

   पाढे पाठांतर स्पर्धा चारही गटात होतील. परिक्षक पाढे मधूनही विचारू शकतील. प्रथम शाळा स्तरावर पाढयांची स्पर्धा घेऊन प्रत्येक गटात प्रत्येक शाळेतून एक मुलगा व एक मुलगी स्पर्धकास पाढयांच्या स्पर्धेत भाग घेता येईल.
8. सारखे गुण मिळाल्यास चिठ्ठया टाकून क्रमांक ठरविण्यात येईल.
9. हस्ताक्षर उताऱ्याचा नमुना कार्यालयाकडून पुरविण्यात येईल. त्याच कागदावर विद्यार्थ्यांना हा उतारा हस्ताक्षरात लिहावा लागेल. सर्व संघातील गुणानुक्रमे प्रथम तीन शाळांना शिल्ड क्र. 1, 2 व 3 दिले जातील. याकरीता प्रथम क्रमांकाला 5 गुण, 2 क्र. 4 गुण, 3 क्र. 3 गुण देण्यात येतील.

**6. नाटय मनोरंजन स्पर्धा :–**

| विभाग | विषय | मुला/मुलींची संख्या | वेळ | खुलासा |
|---|---|---|---|---|
| वैयक्तीक | 1. भजन<br>2. नक्कल<br>3. कथाकथन<br>4. नृत्य | 2 मुले/मुली | 3 मिनीट | वाद्याची साथ घेता येईल. |
| सांघिक | 1. लोकनृत्य<br>2. लोकगीत (कव्वाली)<br>3. प्रयाणगीत<br>4. गोष्टीचे नाटयकरण | 6 ते 10 मुले/मुली | 7 मिनीट | वाद्याची साथ घेता येईल. वीर रसाच्या गीताचा समावेश असवा.<br>गीत मुलांचे राहील. |

**नियम :–**

1. नाटय मनोरंजन शिल्ड करीता शाळांना वैयक्तीक विभागातील सांघिक विभागातील कोणत्याही 3 विषयात भाग घेणे अनिवार्य आहे. अन्यथा शिल्ड स्पर्धेसाठी विचार करता येणार नाही. मात्र वैयक्तीक बक्षिसाकरीता विचार होईल.
2) वैयक्तीक विभागातील कितीही विषयात भाग घेता येईल.

3. सांघीक विभागातील विषयात निर्देशीत केलेल्या विद्यार्थी संख्येत कमी किंवा जास्त आढळल्यास ती चमू नियम बाहय ठरविण्यात येईल. वैयक्तीक विषयात शाळेला 2 मुले किंवा मुली पाठविता येईल, स्पर्धा संपताच निकाल जाहीर करण्यात येईल.
4. वैयक्तीक विषयात मुले/मुली (साथ व साहित्य स्वतःचे आणावे.)
5. केंद्रीय स्पर्धेच्या निकालानुसार प्रत्येक वरच्या तीन क्रमांकाला गुणानुक्रमे तीन बक्षीसे राहील.
6.समान गुण मिळाल्यास चिठ्ठया टाकूण गुणानुक्रम काढण्यात येईल.

**<u>हस्त व्यवसाय स्पर्धा (वेळ 1 तास 30 मि.)</u>**

ही स्पर्धा केंद्रीय होईल. खाली दिलेल्या विषयानुसार शाळांना भाग घ्यावा लागेल. प्रत्येक विषयात 2 मुले/मुली भाग घेतील.

**<u>स्पर्धेची वेळ</u>** :– स्पर्धा 11:00 वाजता सुरू होईल.

**<u>मातीची फळे किंवा वस्तू</u> :–** कोणताही एक नमुना तयार करावा. (साचा किंवा नमुना आणता येणार नाही.)

**खेळणी** :– कापूस, कापड, भूसा इत्यादींची एक प्रतिकृती तयार करावी लागेल. त्याकरिता कापडावर चित्रे काढून आणता येणार नाही.

**टाकाऊ वस्तू पासून कलाकृती :–** धान्य, फळ, बिया, टरफले, पाने काचेचे मणी, चिनी मातीचे तुकडे, पालापाचोळा, पिसे, कापडी, चिंध्या इ. पासून कलाकृती तयार करावी. साहित्य स्वतःचे आणावे.

**चित्रकला :–** कार्यालयातर्फे योग्य आकाराचा ड्राईंग पेपर पुरविण्यात येईल. चित्र दिलेल्या विषयानुसार काढावी लागेल. रंग, ब्रश, पेन्सिल इत्यादी साहित्य स्वतःचे आणावे लागेल. नमुना आणता येणार नाही.

**विषय :–** वर्ग 1 ते 5 करिता – माझी शाळा, निसर्गचित्र
वर्ग 6 ते 8 करिता – पर्यावरण, राष्ट्रीय सण, पाणी वाचवा, विद्युत वाचवा.

**नियम :–** 1) हस्त व्यवसाय शिल्ड स्पर्धेकरिता शाळांना किमान कोणत्याही तीन विषयांत भाग घ्यावा लागले. प्रत्येक विषयांत शाळेला जास्तीत जास्त 2 मुले/मुली पाठविता येईल.
2) कोणतीही शाळा वैयक्तिक बक्षिसाकरिता कितीही विषयात भाग घेऊ शकेल.
3) नियम नं. 1 प्रमाणे भाग न घेणाऱ्या शाळेचा शिल्ड स्पर्धेकरिता विचार केला जाणार नाही.
4) प्रत्येक विषयात भाग घेतलेला आढळून आल्यास नियमाप्रमाणे उच्च गुणाचे विषय लक्षात घेवून शिल्ड स्पर्धेकरिता विचार करण्यात येईल.
5) गुणाणुक्रमे विजयी झालेल्या मुलांमुलींना नं. 1 = 5, 2 = 4, नं 3 = 3, नं. 4 = 2 व नं. 5 = 1 असे गुण हिशेबात धरून दोन्ही संघातील शाळांना गुणानुक्रमे नं. 1, 2, व 3 चे शिल्ड दिले जाईल.
6) समान गुण आल्यास चिठ्ठया टाकून गुणानुक्रम काढण्यात येईल.

**<u>सुचना</u> :–** 1) वरील स्पर्धा प्रत्यक्ष निरीक्षकासमोर घेण्यात येईल.
2) सर्व विषयांच्या स्पर्धा एकाच दिवशी व एकाच वेळी सुरू होतील.

## *विविध सामने*

### कवायत

1) **कवायती कप** – केंद्रीय स्पर्धेत विजयी झालेल्या उच्च गुणाच्या कोणत्याही तीन कवायती (12–10–8) बेरीजवरून करून येणाऱ्या 1, 2, व 3 शाळांना अनुक्रमे क्र. 1 व 2 चे कप देण्यात येतील.
2) **मैदानी खेळ कप सामना –** नियमाप्रमाणे कबड्डी, लंगडी व दौड यात भाग घेतलेल्या शाळांचे केंद्रीय स्पर्धेच्या अंतिम निकालानुसार मैदानी खेळांना 10–8–6 आणि दौडीला 5–4–3 असे गुण हिशोबात धरून त्यांचा बेरजेवरून अनुक्रमे येणाऱ्या नं. 1 व 2 शाळांना अनुक्रमे 1 व 2 चे गुण दिले जातील.

### शिक्षण सप्ताह प्राविण्य.

समाविष्ट शाळांमधून 1) क्रिडास्पर्धा 2) नाटय मनोरंजन स्पर्धा 3) हस्तव्यवसाय 4) बौद्धिक स्पर्धा यांच्या उच्च गुणांच्या बेरजेवरून अनुक्रमे येणाऱ्या नं. 1, 2, व 3 मध्ये येणाऱ्या शाळांना शिक्षण सप्ताह प्राविण्य शिल्ड क्र. 1 व 2 आणि प्रमाणपत्र, पारितोषिक देण्यात येतील.

**नियम :–** 1) प्रत्येक शाळेला एका सांघिक मैदानी खेळात व कवायतीच्या विषयांत भाग घेता येईल.

2) प्राथमिक 1 ते 5 करिता वयोमर्यादा दि. 1/12/2013 ला बारा वर्षापेक्षा जास्त नसावे. उच्च प्राथमिकचे वय दि. 1/12/2013 ला वया 14 वर्षापेक्षा जास्त नसावे.
3) कबड्डी, लंगडी व दौड या स्पर्धा प्रचलीत नियमानुसार होईल.
4) कवायतीच्या प्रत्येक पथकात मुले–मुली मिळून वापरता येतील. व वेगळे पथक शिक्षक असावे.
5) झोन किंवा केंद्रीय स्पर्धेत भाग घेतांना विषयानुसार स्पर्धकांची यादी स्पर्धेच्या आधीच मुख्य पंचाजवळ दयावी. यादीमध्ये नांव दाखल क्रमांक, जन्म तारीख, चमु शिक्षकाचे नाव, सही शिक्का असावा. प्रत्येक स्पर्धक स्पर्धेच्या वेळी शाळेत दाखल असणे आवश्यक आहे.
6) स्पर्धा असतांना परवानगी शिवाय स्पर्धेतून चमूपथक काढून घेता येणार नाही.
7) कोणत्याही विषयांच्या स्पर्धेत नियमबाहय मुले/मुली घेतलेली आढळून आल्यास चमू स्पर्धेतून बाद करण्यात येईल.
8) पंच परिक्षकांचा निर्णय अंतिम राहील.
9) स्पर्धा चालू असतांना खेळाडूंना अथवा पंचाना सूचना देता येणार नाही.
10) स्पर्धेच्या वेळी क्रिडांगणावर चमू सोबत संबंधित शाळेचे जास्तीत जास्त 2 शिक्षक/शिक्षिका येऊ शकतील.
11) स्पर्धा सुरू होण्यापूर्वी किंवा नंतर तसेच स्पर्धा चालू असतांना चमू अथवा पालक शिक्षक/शिक्षकेकडून आज्ञाभंग केलेल्या आढळून आल्यास संबंधीत शिक्षक/शिक्षिका यांचेवर योग्य कारवाई करण्यात येईल.
12) झोन निहाय कबड्डी, लंगडी व दौड तसेच कवायतीच्या प्रथम क्रमाकांच्या चमू केंद्रीय स्पर्धेकरिता निवडल्या जातील.

13) स्पर्धक निश्चित वेळेपूर्वी अर्धा तास अगोदर हजर असणे आवश्यक आहे. उशीर झाल्यास कोणातीही उजर ऐकल्या जाणार नाही.

14) झोन स्पर्धेत विजयी झालेल्या शाळेच्या चमूने केंद्रीय स्पर्धेत भाग घेतला तरच बक्षीसास पात्र ठरेल.

**सूचना :–** 1) प्रवेश पत्र सादर करण्याची अंतीम तारीख 26/12/2013

2) स्पर्धेच्या वेळापत्रक झोन प्रमुख, उपझोन प्रमुख, केंद्रीय समिती याचे नियोजन, स्थळ व वेळ दिनांक याचे संपुर्ण नियोजन फेरीपत्रक वेगळया परिपत्रकाद्वारे कळविण्यात येईल.

3) स्पर्धेत बदल वा एखादी स्पर्धा रद्द करण्याचा अधिकार कार्यालयास राहील.

4) स्पर्धेसाठी मुलांची ने–आण करण्याची जबाबदारी चमू शिक्षक व संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांची राहील. त्यांनी आवश्यकतेनुसार चपराशी यांची व्यवस्था करावी.

5) नाटय मनोरंजन स्पर्धेत कॅसेट व टेप रिकॉर्डचा वापर करता येणार नाही.

## फक्त माध्यमिक विभागासाठी

1) **मैदानी स्पर्धा – इयत्ता 9 व 10 करिता**

| | | |
|---|---|---|
| मुले | – | कबड्डी |
| मुलींसाठी | – | लंगडी |
| मुलांसाठी | – | क्रिकेट (फक्त 8 षटके) |

2) **वैयक्तीक स्पर्धा**

| | | |
|---|---|---|
| 1) 100 मिटर दौड | **इयत्ता** | 9 ते 10 (मुले/मुली) |
| 2) गोळा फेक | **इयत्ता** | 5 ते 8 व 9 ते 10 (मुले/मुली) |
| 3) थाळी फेक | **इयत्ता** | 5 ते 8 व 9 ते 10 (मुले/मुली) |
| 4) लांब उडी | **इयत्ता** | 5 ते 8 व 9 ते 10 (मुले/मुली) |

3) **बौद्धिक स्पर्धा –**

**1)** निबंध स्पर्धा : **इयत्ता 9 व 10 करिता**

विषय – 1) स्वामी विवेकानंद
2) मी मुख्याध्यापक झालो तर

2) **हस्ताक्षर स्पर्धा : इयत्ता 9 व 10 करिता**

3) **चित्रकला स्पर्धा : इयत्ता 9 व 10 करिता**

विषय – 1) प्राणी संग्रहालय
2) पर्यावरण
3) स्वच्छ नागपूर, सुंदर नागपूर
4) माझी शाळा

4) **कविता पाठांतर स्पर्धा** 5) **पाढे पाठांतर स्पर्धा** 6) **प्रश्न मंजुषा स्पर्धा**

## नियम व अटी

**1) निबंध स्पर्धा**
1. प्रत्येक गटात शाळेतून फक्त 2 विद्यार्थी भाग घेतील
2. वेळ : 2 तासाचा राहील
3. भाषा : मराठी, हिंदी, उर्दू
4. परिक्षकांचा निर्णय अंतिम राहील

**2) हस्ताक्षर स्पर्धा**
अ. नमुना कार्यालयाकडून पुरविण्यात येईल
ब. हिंदी, उर्दू, मराठी भाषेतून लिहीता येईल
क. परिक्षकांचा निर्णय अंतिम राहील.

**3) चित्रकला स्पर्धा**
1. स्पर्धेचा अवधी 2 तासांचा राहील.
2. प्रत्येक शाळेतून, दोन विद्यार्थ्यी सहभागी होऊ शकतील.
3. रंग व साहित्य स्वतःचे आणावे लागेल
4. कागद कार्यालयाकडून पुरविण्यात येईल.
5. 1, 2, व 3 क्रमांक काढण्यात येतील.

**4) कविता पाठांतर स्पर्धा**
1. कविता बालभारती पुस्तकातील असावी
2. साथ घेता येणार नाही. परिक्षकाजवळ एक प्रत द्यावी.
3. प्रत्येक शाळेला दोन स्पर्धक पाठविता येईल.

**5) पाढे पाठांतर स्पर्धा**
प्रत्यक्ष शाळेतच स्पर्धेचे आयोजन करून त्यातील फक्त दोनच स्पर्धक पाठवावे.
दोन पासून पुढील जास्तीत जास्त पाढे

**6 प्रश्न मंजुषा स्पर्धा**
1. प्रत्येक शाळेतून फक्त एकच टिम (दोन विद्यार्थी) पाठवावे.
2. सर्व स्पर्धकांची 50 गुणांची एक लेखीपरिक्षा घेण्यात येईल.
3. सामान्यतः अभ्यासक्रमावर आधारित प्रश्न असतील.
मराठी, हिंदी, गणित, विज्ञान, इतिहास, भूगोल, या विषयावर आधारीत व काही सामान्य प्रश्न असतील.

**सूचना :** प्रवेश अर्ज 28/12/2013 पर्यंत क्रीडा व सांस्कृतिक विभाग म.न.पा. येथे पाठवावे.
शाळा कोणत्या झोनमध्ये येते ते नमूद करावे.
प्रत्येक माध्यमिक शाळेने स्पर्धेचे भाग घेणे अनिवार्य आहे. स्पर्धेचे वेळापत्रक बैठकीचे आयोजन करून देण्यात येईल.

# समारोपीय कार्यक्रम

**1) समारोप कार्यक्रमात खालील शाळांचा सहभाग राहील.**

★ दुर्गानगर माध्य. विद्यालय (सामुहीक नृत्य)

★ बॅ. शेषराव वानखेडे विद्यानिकेतन (पिरॅमिडस्)

★ डॉ. राममनोहर लोहिया माध्य. विद्यालय (लेझीम)

★ सरस्वती तिवारी हिंदी माध्य. शाळा (सामुहीक नृत्य)

★ पारडी उच्च प्राथ. शाळा (सामुहीक नृत्य)

★ बॅ. शेषराव वानखेडे शाळेचे स्वागतगीत इतर देशभक्ती पर गीत सादर करतील. उपरोक्त सर्व कार्यक्रम हा समारोपीय कार्यक्रमात सादर करावयाचा असल्याने कार्यक्रमाचा दर्जा चांगला राहील. याची जबाबदारी शाळेच्या मुख्याध्यापकावर सोपविण्यात आली आहे. सदर कार्यक्रम मुख्याध्यापकाने स्वतः जातीने हजर राहून आपल्या शाळेचा कार्यक्रम दर्जेदार कसा होईल. याकडे लक्ष देणे आवश्यक राहील.

★ कार्यक्रम सादर करण्यासाठी कमीत कमी खर्च पण दर्जेदार कार्यक्रम साजरा करण्याची जबाबदारी मुख्याध्यापकांना स्विकारावी लागेल.

★ चित्रकला व इतर स्पर्धेतील कलाकृतीचे प्रदर्शन समारंभीय कार्यक्रमात लावण्यात येईल.

★ उत्कृष्ट खेळ प्रकारात स्पर्धक व वैयक्तीक स्पर्धेतील स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात येतील. स्मृतीचिन्ह हे सांघीक खेळांला व त्याचप्रमाणे जास्त गुण मिळविण्याऱ्या शाळेला प्राविण्य शिल्ड देण्यात येईल.

★ एखादी स्पर्धा वाढविणे किंवा कमी करणे यांचा हक्क कार्यालयास राहील.

★ स्पर्धेच्या आयोजन नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक राहील. परिक्षकांचा निर्णय अंतिम राहील. यांत शिक्षकांचा उजर ऐकल्या जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**शिक्षणाधिकारी**
**तथा क्रीडा व सांस्कृतिक अधिकारी**

E:\VAN-FEB\Dongarwar Sir\Itivruta

**झोन क्र.** ................

.................................

# 'प्रवेश पत्र' चा नमुना

**प्रति,**

मा. शिक्षणाधिकारी (प्राथ.)
म.न.पा. नागपूर

**शाळेचे नांव :–** ........................................................................................................................ .....

<table>
<tr><td rowspan="4">गटाचे नांव</td><td colspan="5">विषय</td></tr>
<tr><td colspan="2">1</td><td>2</td><td>3</td><td>4</td></tr>
<tr><td colspan="2">क्रिडा स्पर्धा</td><td rowspan="2">बौद्धिक स्पर्धा</td><td rowspan="2">हस्त व्यवसाय स्पर्धा</td><td rowspan="2">2 ते 10 पर्यंत</td></tr>
<tr><td>कबड्डी</td><td>लंगडी</td></tr>
<tr><td>अ</td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>ब</td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>क</td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>ड</td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
</table>

मुख्याध्यापक

..................................................................... प्राथ. शाळा

म.न.पा. नागपूर